ISSN 2278-8808 SJIF 2014 = 4.889
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# बी.एड. महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांच्या समावेशनासाठी केल्या जाणाऱ्या प्रयत्नांचा अभ्यास

**श्री. प्रकाश बच्छाव**

*प्रशासनिक अधिकारी, उच्च शिक्षण विभाग, पुणे.*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

## १.१ सैद्धांतिक पार्श्वभूमि

भारताला समावेशी शिक्षणाचा जवळपास ५००० वर्षा इतिहास लाभला आहे. वैदिक काळामध्ये शिक्षण हे जीवनाच्या तत्त्वज्ञानाशी संबंधित होते. या काळामध्ये शिक्षण व्यवस्था ही गुरूकुल पद्धतीची होती. या काळामध्ये विद्यार्थ्यांना गुरूगृही जावून त्यांच्याबरोबर राहून त्यांच्या नियमांप्रमाणेच प्रत्यक्ष अभ्यास आणि चर्चांमधून शिक्षण घ्यावे लागत असे. गुरू शिष्याच्या या परंपरेमध्ये सर्व बालके त्यामध्ये सामान्य, प्रज्ञावान आणि विशेष बालकांचाही समावेश होता ते एका झाडाच्या सावलीला बसून एकत्र शिक्षण घेत असत. यामध्ये असे दिसून येते की प्रत्येकाला त्याच्या क्षमतेप्रमाणे शिक्षणाचे चांगले लाभ मिळून येत असत. गुरूकुलामध्ये सर्व प्रकारचे विद्यार्थी एकत्र बसून शिक्षण घेत होते हे त्या काळातील समावेशी शिक्षणाचे उदाहरण आहे. त्या काळात विशेष गरजा पूर्ण करण्यासाठी कोणत्याही विशेष शाळा नव्हत्या. जे विद्यार्थी सामान्य शालेय अध्ययनामध्ये अक्षम आढळून येत असत त्यांना जे सहज करता येईल अशा अन्य व्यावसायिक विषयांचे शिक्षण दिले जात असे यामध्ये गुरे सांभाळने, बागकाम अथवा घरकाम इत्यादी.

याकडे एक रोजगाराची संधी म्हणून पाहिले जात होते अनादर म्हणून नव्हे. त्यावेळी असे मानले जाई की कर्माच्या सिद्धांतानुसार ही अक्षमता असते आणि त्यांना शिक्षण देने म्हणजे दुसऱ्या जन्मात चांगले जीवन मिळण्यासाठी आहे. नंतरच्या काळात सम्राट अशोकाने अक्षम असणाऱ्यांसाठी हॉस्पिटल तसेच आधारगृहे स्थापन केली होती. या क्रमामध्ये विष्णु बर्मनचे योगदान मैलाचा दगड सिद्ध झाले. एका राजाची तीनही मुले मंद असल्याने त्याला त्याच्या वारसाची चिंता होती. त्याने विश्वभर अशा शिक्षकांचा शोध घेतला की जे त्याच्या मुलांना शिकवू शकतील. शेवटी हतबल राजाला विष्णुबर्मन जो त्याच्याच दरबारात होता त्याने आशेचा किरण दाखविला. त्याने राजाला शाही व्यक्तींना शिकविण्यासाठी विशेष युक्त्या शोधण्याचे वचन दिले. त्याने प्राणी गाथांचे संकलन विकसित करून अध्यापनाच्या कार्यनीती तयार केल्या ज्यांच्या मार्फत त्याने

राजकुमारांना राजनैतिक तसेच मूल्यविषयक घटक समजावून सांगीतले. विष्णु वर्मनच्या प्रयत्नांचे फलित म्हणून प्राणी गाथांचे संकलन करून कार्यनीति विकसित झाल्या आणि त्याचा परिपाक पंचतंत्र या विशेष शिक्षणाच्या पहिल्या ग्रंथात आढळून आला.

आज प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत सर्वसमावेशकतेचा प्रसार झाला आहे. त्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. प्रस्तुत संशाधनाच्या माध्यमातून संशोधकाने बी.एड. महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांच्या समावेशनासाठी केल्या जाणाऱ्या प्रयत्नांचा अभ्यास केला आहे.

**१.२ सामान्य पार्श्वभूमि**

गेल्या कित्येक वर्षांपासून सर्वशिक्षा अभियानांतर्गत प्राथमिक स्तरावर सर्वसमावेशी शिक्षणासाठी प्रयत्न केले जात आहेत आणि त्याचे सकारात्मक परिणामही प्राप्त झाले आहेत. काही प्रमाणात अपंगत्व, कमतरत असणाऱ्या विद्यार्थ्यांना सर्वसामान्य विद्यार्थ्यांबरोबर शिकविल्यानंतर असे आढळून आले आहे की त्याचा सर्व प्रकारच्या विद्यार्थ्यांना फायदाच होतो. सर्वसमावेशकतेचा हाच दृष्टिकोन उच्च शिक्षणामध्येही आणला जात आहे. या वर्षी २०१५—१६ पासून बी.एड. कोर्स २ वर्षांचा करण्यात आले आहे. त्यापुढे आता वेगळी आव्हाने आहेत. सुरूवातीला सर्वसमावेशकतेसाठी विद्यार्थी एकच वर्ष महाविद्यालयात असत ते आता २ वर्षे थांबणार आहेत. प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाने बी.एड. महाविद्यालयांमधून विद्यार्थ्यांच्या सर्वसमावेशकतेसाठी केल्या जाणाऱ्या प्रयत्नांचा अभ्यास केला आहे.

**१.३ संशोधनाची गरज व महत्त्व**

- सदर संशोधनामुळे बी.एड. अभ्यासक्रमांतर्गत शारीरिक अक्षम विद्यार्थ्यांच्या समावेशासाठी महाविद्यालय करत असणाऱ्या प्रयत्नांची सद्य:स्थिती स्पष्ट झाली.
- सदर संशोधनामुळे बी.एड. मधील विद्यार्थ्यांच्या समावेशकतेसाठी केल्या जाणाऱ्या प्रयत्नांना एक नवी दिशा मिळणार आहे.
- सदर संशोधनामुळे बी.एड. मधील विद्यार्थ्यांच्या समावेशकतेसाठी कोणते प्रयत्न केले जाऊ शकतात याबाबत विचार करण्यासाठी नवी दिशा मिळणार आहे.

**१.४ समस्या विधान**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न बी.एड. महाविद्यालयांमधून विद्यार्थ्यांच्या समावेशनासाठी केल्या जाणाऱ्या प्रयत्नांचा अभ्यास करणे.

**१.५ कार्यात्मक व्याख्या**

**१. बी.एड. महाविद्यालये**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी वर्ष २०१५—१६ साली संलग्न असलेले आणि जेथे नियमित बी.एड. अभ्यासक्रम राबविला जातो अशी महाविद्यालये.

**२. विद्यार्थी**

बी.एड. चे शिक्षण घेणारे शारीरिक दृष्टीने अक्षम आणि महिला छात्राध्यापक म्हणजे विद्यार्थी.

**३. समावेशकतेसाठी प्रयत्न**

बी.एड. मध्ये वर्गाध्यापन, प्रात्यक्षिक पूर्ण करणे आणि सरावपाठ यासाठी समावेशी विद्यार्थ्यांसाठी दिल्या गेलेल्या सवलती, त्यांचे समावेशन करण्यासाठी केले जाणारे वेगळे प्रयत्न.

**१.६ संशोधनाची उद्‌दिष्टे**

१. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न बी.एड. महाविद्यालयांमधून विद्यार्थ्यांच्या समावेशनासाठी केल्या जाणाऱ्या प्रयत्नांचा अभ्यास करणे.

**१.७ संशोधन प्रश्न**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न बी.एड. महाविद्यालयांमधून विद्यार्थ्यांच्या समावेशनासाठी कोणते प्रयत्न केले जातात?

**१.८ संशोधनाची गृहीतके**

१. बी.एड. महाविद्यालयांमधून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये समावेशकता दिसून येते.

२. बी.एड. महाविद्यालयांमधून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सरकारी आरक्षणानुसार गुणवत्तेवर आधारित प्रवेश दिला जातो.

३. बी.एड. महाविद्यालयांमधून उपलब्ध करून द्यावयांच्या न्यूनतम साधन सुविधांचे निकष आहेत.

**१.९ संशोधनाची व्याप्ती, मर्यादा व परिमर्यादा**

- **व्याप्ती**

१. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे ही सदर संशोधनाची भौगोलिक व्याप्ती आहे.

२. सदर संशोधन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न बी.एड. महाविद्यालयांशी संबंधित आहे.

३. सदर संशोधन हे विद्यार्थ्यांच्या समावेशकतेशी संबंधित आहे.

४. सदर संशोधनाचे निष्कर्ष सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील बी.एड. महाविद्यालयांना लागू आहेत

- **मर्यादा**

१. सदर संशोधनात माहिती संकलन करण्यासाठी प्रमाणित माहिती संकलन साधन उपलब्ध नव्हते.

२. सदर संशोधनामध्ये माहिती संकलनार्थ वापरण्यात आलेले साधन संशोधक निर्मित आहे.

३. सदर संशोधनामध्ये माहिती संकलनार्थ वापरण्यात आलेले साधन प्रमाणित करण्यात आले नाही.

४. सदर संशोधनाचे निष्कर्ष संशोधकाने तयार केलेल्या माहिती संकलन साधनाला नमुना प्रतिसादकांनी दिलेल्या प्रतिसादकावर अवलंबून आहेत.

- **परिमर्यादा**

१. सदर संशोधनामध्ये समावेशकतेसाठी प्रयत्न या संकल्पनेच्या अंतर्गत केवळ वर्गाध्यापन, प्रयत्यक्षिक आणि सराव पाठ या घटकांचाच विचार केला आहे.

२. सदर संशोधनांमध्ये माहिती व भौगोलिक व्याप्ती पाहता माहिती संकलन करण्यासाठी निवडक महाविद्यालयांचाच विचार केला आहे.

**१.१० संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधनात माहिती संकलन करण्यासाठी सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब करण्यात आला.

**१.११ जनसंख्या व नमुना**

- **जनसंख्या**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांतील सर्व प्राध्यापक ही सदर संशोधन अभ्यासाची जनसंख्या आहे.

- **नमुना**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांतील सर्व प्राध्यापकांपैकी २० शिक्षकांची निवड सदर संशोधनासाठी असंभाव्यता आधारित प्रासंगिक नमुना निवड पद्धतीने नमुना म्हणून करण्यात आली.

**१.३ माहिती संकलनाचे साधन**

सदर अभ्यासासाठी संशोधकाने एक पडताळा सूची तयार केली ज्यामध्ये एकूण १० विधानांचा समावेश होता. प्रत्येक विधानाला प्रतिक्रिया देण्यासाठी होय आणि नाही अशे दोनच पर्याय देण्यात आले होते.

**१.४ माहिती विश्लेषणाचे साधन**

प्रस्तुत अभ्यासामध्ये पडताळा सूचीद्वारे संकलित माहितीचे शेकडेवारी या संख्याशास्त्रीय साधनाच्या मदतीने विश्लेषण केले आहे.

**१.५ संशोधनाची कार्यवाही**

- सर्वप्रथम प्रस्तुत अभ्यासासाठी २० शिक्षकांची परवानगी घेऊन त्यांची नमुना म्हणून निवड करण्यात आली.
- माहिती संकलित करण्यासाठी पडताळा सूचीी निर्मिती करण्यात आली.
- पडताळा सूची निवडलेल्या २० महाविद्यालयीन प्राध्यापकांकडून भरून घेण्यात आली.

- पडताळा सूचीला शिक्षकांनी नोंदविलेल्या प्रतिसादावरून शेकडेवारी या संख्याशास्त्रीय साधनाच्या सहाय्याने प्रत्येक विधानाचे विश्लेषण करण्यात आले.
- संकलित माहितीचे विश्लेषण केल्यानंतर सदर संशोधनाचे निष्कर्ष काढण्यात आले.

**१.६ निष्कर्ष**

१. बी.एड. महाविद्यालयांमधून अध्यापन करत असताना शिक्षकांद्वारे समावेशकतेचा विचार करून वेगळे प्रयत्न केले जात नाहीत.

२. बी.एड. महाविद्यालयांमधून अध्यापन करत असताना कोणत्याही विद्यार्थ्यांनी विचारलेल्या शंकांचे निरसन शिक्षकांमार्फत केले जाते.

३. बी.एड. महाविद्यालयामधून सर्वसमावेशकतेचा विचार करून अभ्यासात मागे राहिलेल्या विद्यार्थ्यांना स्वतंत्ररित्या पुन्हा मार्गदर्शन केले जाते.

४. प्रात्यक्षिकांचे वाटप करताना समावेशकतेचा विचार केला जात नाही.

५. प्रात्यक्षिक पूर्ण करण्यासाठी आवश्यकता भासल्यास समावेशकतेचा विचार करून काही विद्यार्थ्यांना पुन्हा मार्गदर्शन केले जाते.

६. प्रात्यक्षिक जमा करण्यासाठी समावेशकतेचा विचार करून काही विद्यार्थ्यांना वेळ वाढवून दिली जाते.

७. बी.एड. महाविद्यालयांमधून सरावपाठ लावताना समावेशकतेचा विचार केला जातो.

**१.७ निष्कर्षावरील चर्चा**

प्रस्तुत अभ्यासामध्ये बी.एड. महाविद्यालयांमधून समावेशकतेसाठी केल्या जाणाऱ्या प्रयत्नांचा अभ्यास करण्यात आला आहे. अभ्यासाच्या निष्कर्षावरून असे लक्षात येते की, महाविद्यालयीन प्राध्यापक अध्यापनाचे नियोजन करताना सर्वसमावेशकतेचा वेगळा विचार करत नाहीत परंतु अध्यापनादरम्यान विचारल्या जाणाऱ्या कोणत्याही समस्यांचे समाधान करतात. प्रात्यक्षिक आणि सरावपाठाबाबत मात्र बी.एड. महाविद्यालयांमधून समावेशकतेसाठी वेगळा विचार करून त्यासाठी सकारात्मक प्रयत्नही केले जातात.

- **संदर्भसूची**

*करंदीकर, सु. (२००६). शैक्षणिक मानसशास्त्र (सहावी आवृत्ती). कोल्हापूर फडके प्रकाशन.*

*चव्हाण, दि. के. (२००६). महाविद्यालयीन अध्यापक. नाशिक: इनसाइट पब्लिकेशन्स.*

*चव्हाण, दी. के. व मुळे, सं. ज्ञा. (२०१०). शैक्षणिक संशोधन आराखडा. नाशिक:इनसाइट पब्लिकेशन.*

*मुळे,सं. आणि राजपुत, कु.(२०१३). संपूर्ण शिक्षणशास्त्र नेट सेट. पुणे: ऑथर्स अॅव्हेन्यु पब्लिकेशन्स. पृष्ठ ४५४—४५७.*

*Balasundaram, Pramila (9TH JULY 2005). THE JOURNEY TOWARDS INCLUSIVE EDUCATION IN INDIA. Paper PRESENTED AT SEISA UNIVERSITY. ASHIBETSU SHI, HOKKAIDO, JAPAN*